खाजगी प्रवासासाठी परकीय चलन साठी एपी. (डीआयआर सिरीज) प्रसिद्धीपत्रक क्र. ३१. १८ ऑक्टोंबर २००२
भारतीय रिझर्व बँक
एक्सचेंज कंट्रोल विभाग
मध्यवर्ती कार्यालय
मुंबई – ४००००१
१८ ऑक्टोबर २००२
एपी. (डीआयआर सिरीज) प्रसिद्धीपत्रक क्र. ३१

प्रति,
परकीय चलन व्यापार करणारे अधिकृत व्यापार

प्रिय महोदय / महोदया,

**खाजगी प्रवासासाठी परकीय चलनाचा पुरवठा**

नेपाळ आणि भूतान ही राष्ट्रे सोडून इतरत्र खाजगी प्रवास करण्यासाठी परकीय चलन देणाऱ्या सर्व अधिकृत व्यापारांना ५००० युएस डॉलर्स पर्यंतची रक्कम देण्यासाठी जी वर्षातून एकदा एक किंवा जास्त प्रवासी जे परदेशी जाणार आहेत त्यांसाठी ३ मे २००० चे भारत सरकारचे प्रसिद्धी पत्रक नं. जीएसआर. ३८४(ई) च्या अनु. क्र. २ शेड्युल ३ प्रमाणे रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

२) रिझर्व बँकेच्या विभागीय कार्यालयात अशा स्वरुपात आलेल्या अर्जांचे योग्य रीतीने विल्हेवाट लावणे साठी एक उपअधिकारी नेमला असून असे अर्ज आले त्याच दिवशी निकाली काढले जावेत. सर्व विभागी कार्यालयांमधे या उपअधिकाऱ्याचे नावे, पत्ते, फोन नंबर, फॅक्स नंबर व ई-मेल पत्ता वगैरेची माहिती सोबतच्या पत्रानुसार पुरविली आहे. खाजगी प्रवासासाठी जर युएस डॉलर्स रुपये ५००० पेक्षा जास्त रक्कम मिळण्यासाठी अर्ज आला असल्यास तो ई-मेल द्वारे किंवा फॅक्स द्वारे विभागीय कार्यालया कडे पुढील कारवाईसाठी पाठविणे आवश्यक आहे.

३) या बाबत कोणतीही शंका किंवा अडचण असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, एक्स्चेंज कंट्रोल डिपार्टमेंट, भारतीय रिझर्व बँक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचेशी दूरभाष २६६३५९६ वर किंवा फॅक्स नं. २६६१७२२ वर संपर्क साधावा.

४) सर्व संबंधित अधिकृत व्यापाऱ्यांनी या प्रसिद्धीपत्रका बाबत आपल्या संबंधित व्यक्तींना माहिती द्यावी.

५) परकीय चलन वितरव कायदा १९९९ (४२/१९९९) चे कलम १० (४) व कलम १७(१) प्रमाणे हे प्रसिद्धीपत्रक देण्यात आले आहे.

आपला विश्वासू
ग्रेस कोशी
मुख्य कार्यकारी अधिकारी